


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ११९, बुधवार १७ जानेवारी २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# शिवस्वराज्य यात्रेचा नगरमध्ये उत्साहात समारोप

■ फटाक्यांची आतिषबाजी, ढोलताशांच्या गजराने दुमदुमले नगर शहर
■ रॅलीमध्ये हजारो तरूणांचा सहभाग





■ राणीताई लंके यांच्या उपस्थितीत काढण्यात आलेल्या शिवस्वराज्य यात्रेचे रॅलीने जात नगर शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून सांगता करण्यात आली. (छायाचित्रे : सुदेश आबूज)

नगर : सुदेश आबूज

**फटाक्यांची आतिषबाजी, ढोलताशांचा गजर, रॅलीच्या अग्रभागी घोडयांवर आरूढ झालेले छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ व मावळयांची वेषभूषा केलेले मुले, छत्रपती शिवरायांच्या गगनभेदी घोषणा देत जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या राणीताई नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली नगर दक्षिण मतदारसंघात काढण्यात आलेल्या शिवस्वराज्य यात्रेचा मोठया उत्साहात समारोप करण्यात आला.**

जिल्हा परिषद तसेच जिल्हा नियोजन मंडळाच्या मा. सदस्या, मा. उपसभापती राणीताई नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून नगर दक्षिण मतदारसंघातील पाथर्डी, शेवगांव, कर्जत, जामखेड, श्रीगोंदे, राहुरी, नगर या तालुक्यांमध्ये शिवसंवाद यात्रेचे अयोजन करण्यात आले होते. मंगळवारी नगर शहरात या यात्रेचा शहरातून रॅली काढून समारोप करण्यात आला. बस स्थानक चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून या यात्रेची सांगता करण्यात आली.

यावेळी बोलताना राणीताई लंके म्हणाल्या, २ जानेवारी रोजी मोहटादेवी, पाथर्डी येथून शिवस्वराज्य यात्रेस प्रारंभ करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळयास साडेतीनशे वर्षे पुर्ण होत असल्याचे औचित्य साधून या यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. मनामनात, घराघरात शिवरायांचे विचार कसे पोहचतील, कसे रूचतील यासाठी नगर दक्षिणमधील खेडा पाडयांमध्ये, गावागावांमध्ये ही यात्रा पोहचली. कर्जत, जामखेड, शेवगांव, श्रीगोंदे, राहुरी, पाथडी, नगर तालुक्यातील जनतेकडून आपणास मोठा प्रतिसाद मिळाला. जनतेकडून या यात्रेचे मोठे कौतुक झाल्याचे राणीताई लंके यांनी सांगितले.

यावेळी नगर तालुका दुध संस्थेचे चेअरमन गोरख काळे, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य शिवाजी पाटील होळकर, बाजार समितीचे मा. उपसभापती भाउसाहेब काळे, अरणगांवचे सरपंच पोपट गुंड, उपसरपंच विठठल दळवी, टाकळी खातगांवचे सरपंच राजू नरवडे, बी.आर.कर्डीले, तात्यासाहेब कर्डीले, एकनाथ झावरे, बाळासाहेब पानसरे, नेप्तीचे सरपंच संजय जपकर, माजी सरपंच विठ्ठल जपकर, वसंत पवार, निंबळकचे सरपंच अजय लामखडे, इसळकचे सरपंच संजय गेरंगे, निमगांव वाघाचे मा. साहेबराव बोडखे, पिंपळगांव वाघाचे सरपंच दिलीप नाट, गणेश साठे, बाळासाहेब पानसांबळ, महेंद्र शिंदे, नगरसेवक दत्ता जाधव, संजय जाधव, अशोक सोनवणे, अशोक शिंदे, भोयरेपठारचे सरपंच बाबा टकले, नवनागापुरचे सरपंच डॉ. बबनराव डोंगरे, लक्ष्मण डोंगरे, इनामकर मामा, वाकोडीचे माजी उपसरपंच अमोल तोडमल, शरद कोठुळे, अविनाश गायकवाड, अविनाश जाधव, राजाराम धामणे, बाबुर्डी बेंदचे सरपंच वैभव खेंगट, अण्णा चोभे, जनाभाउ माने, सोनवणे मेजर, दत्ता खताळ, नितीन भांबळ, विनोद बोरगे, दादा जाधव, अकोळनेरचे भगवान भोर, उपसरपंच संग्राम गायकवाड, तात्याभाउ जाधव, नितीन पवार, नंदाताई शेंडगे, गारूडकर सर, भगवान जाधव, सागर शेळके आदी यावेळी उपस्थित होते.

## छत्रपतींचे विचार रूजविण्यासाठी पुढाकार

छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार विचार मांडण्याचा प्रयत्न या यात्रेच्या माध्यमातून झाला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात जनता सुखी होती. सर्वधर्मसमभाव त्यावेळी नांदला जात होता. सध्याचा काळ पाहिला तर अवघड परिस्थिती होत चालली आहे. त्यामुळे छत्रपतींचे विचार रूजविण्यासाठी राणीताई लंके यांनी पुढाकार घेत या यात्रेचे आयोजन केले.

**सुदाम पवार**
प्रदेशाध्यक्ष, नीलेश लंके प्रतिष्ठाण

## आम्हा महिलांसाठी अभिमान

साडेतीनशे वर्षांपूर्वीचा इतिहास राणीताई लंके यांनी लोकांच्या मनामनात पौचहविला, घराघरात पोहचविला ही आम्हा महिलांसाठी अभिमानाची बाब आहे. २४ तास ३६५ दिवस जनतेच्या प्रश्नांसाठी झटणारे हे लंके कुटूंब आहे. आ. नीलेश लंके यांच्या प्रमाणेच त्यांच्या पत्नी राणीताई देखील आ. लंके यांच्या दोन पाउले पुढे म्हटले तरी वावगे होणार नाही असे काम करीत आहेत. सत्ता असो वा नसो हा परिवार नेहमीच समाजासोबत राहिलेला आहे. त्यामुळे लंके यांच्यासारख्या सामान्य कुटूंबाला साथ देणे गरजेचे आहे. काहींना वाटते की नगर दक्षिण हा मतदारसंघ आमच्या हक्काचा आहे. मात्र नगर दक्षिण नाही कुणाच्या बापाचा आहे तर सर्वसामान्यांच्या हक्काचा आहे.

**सुवर्णा धाडगे**
तालुकाध्यक्ष महिला आघाडी

## लंके दाम्पत्याच्या कृतीत शिवरायांचे विचार

शिस्वराज्य यात्रा लंके परिवारासाठी नवी नाही. चार वर्षापूर्वी पारनेर-नगर मतदारसंघात जनसंवाद यात्रा काढण्यात आली होती. ज्यावेळी ही यात्रा नगर तालुक्यातील देहरे गावात आली. त्यावेळी गर्दीमध्ये चार मुले अनवानी पायाने चालत होती. आ. लंके यांच्या ही बाब लक्षात आल्यानंतर त्यांनी त्यांना जवळ बोलवून घेतले आणि चौघांनाही चप्पल घेऊन दिली. या मतदारसंघातील एकही माणूस अनवाणी चालणार नाही असा निर्धार करीत आजवर त्यांनी २५ हजार अनवानी पायांना चप्पल देण्याचे काम केले आहे. हा प्रवास इथवरच थांबला नाही तर शाळेचा प्रवास सुसाहय करण्यासाठी मतदारसंघातील १५ हजार विद्यार्थ्यांना सायकलचे त्यांनी वितरण केले आहे. स्पर्धा परिक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कोटयावधी रूपयांच्या अभ्यासिकाही त्यांनी उभारल्या. त्यामुळे खऱ्या अर्थाने शिवाजी महाराजांचे विचार पेरण्याचं, व ते प्रत्यक्ष कृतीत आणण्याचं काम कोणत्या नेतृत्वात असेल तर ते नाव आहे. राणीताई नीलेश लंके आणि नीलेश ज्ञानदेव लंके. आजही प्रत्येकाच्या सुख, दुःखात सहभागी होणारा, प्रसंगी असो सुख, दुःखाचा लंके परिवार आपल्या हक्काचा हे समिकरण अलिकडच्या काही वर्षात रूढ झाले आहे.

**जीतेश सरडे,** राष्ट्रवादी युवक पदाधिकारी

## रॅलीचा मार्ग

सक्कर चौकातून रॅलीस प्रारंभ होऊन टिळक रोड, आयुर्वेद महाविद्यालय, माळीवाडा या मार्गाने ही रॅली बस स्थानक चौकातील शिवाजी महाराजांच्या पुतळयापर्यंत पोहचली. रॅलीमध्ये नगर तालुक्यासह शहरातील नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते.

## ठिकठिकाणी स्वागत

रॅलीदरम्यान नगर शहरवासीयांच्या वतीने ठिकठिकाणी राणीताई लंके यांचा सत्कार करण्यात आला. शिवरायांचे विचार घराघरात, गावागावात पोहचविण्यासाठी राणीताई लंके यांच्यासारख्या महिलेने घेतलेल्या पुढाकाराचे महिलांनी कौतुक करीत पती आ. नीलेश लंके यांच्याप्रमाणेच राणीताई देखील त्यांच्या पावलावर पाउल ठेवून कर्तृत्त्व सिध्द करतील असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## १३जेसीबीमधून गुलाबपुष्पवृष्टी

बसस्थानक परिसरात राणीताई लंके यांच्या नेतृत्वाखालील रॅली पोहचल्यानंतर १३ जेसीबींमधून रॅलीवर गुलाबपुष्पवृष्टी करण्यात आली. पुष्पवृष्टीमुळे बसस्थानक परिसरातील रस्त्यावर फुलांच्या पाकळयांचा सडा पडला होता.

## विशाल गणपतीचे दर्शन

रॅली वाजत गाजत माळीवाडयात पोहचल्यानंतर शहराचे ग्रामदैवत विशाल गणपती मंदीरात जाऊन राणीताई लंके व त्यांच्या सहकारी महिलांनी दर्शन घेतले. यावेळी देवस्थानच्या वतीने राणीताई लंके यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

## राणीताईचे अभिवादन

नगर शहराचे ग्रामदैवत विशाल गणपतीचे दर्शन घेतल्यानंतर कारच्या सनरूफमध्ये उभे राहून राणीताई लंके यांनी नगरकरांना अभिवादन केले. रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असलेल्या नागरीकांनी लंके यांच्या अविवादनाचा स्विकार करीत त्यांच्या उपक्रमास तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# दादा म्हणाले तर कोणतीही निवडणूक लढवू !

■ आ. नीलेश लंके यांची भूमिका ■ शिवस्वराज्य यात्रेचे संकल्पना राणी लंके यांची ■ निवडणूक लढविण्याच्या राणी लंके यांच्या वक्तव्याचा विपर्यास

नगर : सुदेश आबूज

**मी एक अज्ञाधारक कार्यकर्ता आहे. मी अज्ञाधारक असल्याने मला वरिष्ठ नेतेमंडळींनी, अजितदादा पवार यांनी आदेश केला तर मी कोणतीही निवडणूक लढवू शकतो असे सांगत आमदार नीलेश लंके यांनी शिवस्वराज्य यात्रेची संकल्पना ही राणीताई लंके यांची असून निवडणूक लढविण्याबाबतच्या त्यांच्या वक्तव्याचा विपर्यास करण्यात आल्याचे आ. नीलेश लंके यांनी सांगितले.**

राणीताई लंके यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या शिवस्वराज्य यात्रेच्या समारोप समारंभास आ. नीलेश लंके हे उपस्थित राहणार असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र या सांगता सभेस आ. लंके हे उपस्थितच राहिले नाहीत. त्यानंतर पत्रकारांनी त्यांना त्यांच्या नगर येथील संपर्क कार्यालयात गाठले असता त्यांनी पत्रकारांशी मनमोकळा संवाद साधला.



राणीताई लंके यांनी निवडणूक लढवावी असे तुम्हाला वाटते का असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमचे नेते अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली काम करणारा मी कार्यकर्ता आहे. मला अजितदादांनी लोकसभा निवडणूक लढविण्याबाबत विचारणा केलेली नाही अथवा त्याबाबत कोणतीही चर्चाही झालेली नाही. तुमची तयारी आहे का असे विचारले असता मी एक अज्ञाधारक कार्यकर्ता आहे. मी ज्या पक्षात काम करतो त्या पक्षाच्या शेवटच्या थरातील कार्यकर्ता आहे. मी अज्ञाधारक असल्याने मला वरीष्ठ नेतेमंडळींनी आदेश केला तर मी कुठलीही निवडणूक लढवू शकतो असे लंके म्हणाले.

## माझी नव्हे राणी लंके यांची संकल्पना

ही यात्रा आपल्या नव्हे तर राणी लंके यांच्या संकल्पनेतून काढण्यात आली होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळयास ३५० वर्षे पुर्ण झाल्याचे औचित्य साधून या यात्रेचे आयोजन करण्यात आल्याचे आपणास सांगण्यात आले. आज समाजात, जाती, धर्मात तेढ निर्माण होत असल्याचे चित्र आहे. संघर्ष पहावयास मिळत आहे. छत्रपती शिवरांनी आठरापगड जातीच्या लोकांना एकत्र केले आणि हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. खऱ्या अर्थाने आज छत्रपतींच्या विचारांची समाजाला गरज आहे. त्यामुळे आई मोहटादेवी मंदीरापासून या यात्रेस प्रारंभ करण्यात आला होता. व नगर शहरात या यात्रेचा समारोप करण्यात आला.

**आ. नीलेश लंके**

## वेळेच्या बंधनामुळे दक्षिण नगरमध्येच यात्रा

नगर दक्षिण मतदारसंघातच ही यात्रा का काढण्यात आली असे विचारले असता वेळ थोडा होता. छत्रपती संभाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनाच्या दिवशी या यात्रेची सांगता करण्याचे नियोजन होते. या कालावधीत संपूर्ण जिल्हा पुर्ण होत नसल्याने किमान अर्ध्या जिल्हयात ही यात्रा पोहचल्याचे लंके म्हणाले. वेळ कमी असल्याने पारनेर तालुक्यातही ही यात्रा पोहचू शकली नसल्याची पुष्टीही त्यांनी जोडली.

## त्यांच्या नियोजनात हस्तक्षेप नको म्हणून

शिवाजी महाराजांचे विचार राणीताई लंके या घराघरापर्यंत पोहचवत असतना तुम्ही मात्र या यात्रेकडे पाठ का फिरविली असे विचारले असताना महाराष्ट्रात राहणारा प्रत्येक व्यक्ती हा छत्रपती शिवरायांचा मावळा आहे. मी सहभागी झालो नाही कारण ज्यांनी नियोजन केले त्यांच्या नियोजनात हस्तक्षेप होउ नये म्हणून आपण या यात्रेत सहभागी झालो नसल्याचे लंके म्हणाले. शिवाय इंदुर येथे असलेल्या आपल्या चुलतीचे निधन झाल्याने आपण तिकडेच होतो, त्यामुळे ही यात्रा सुरू झाल्यानंतरच त्याची माहीती आपणास समजल्याचेही लंके म्हणाले.

## राणी लंके यांच्या अनुभवाचा फायदा

यात्रेस चांगला प्रतिसाद मिळतो असल्याने निवडणूकीसाठी तुम्हाला अनुकूल वातावरण आहे असे तुम्हाला वाटते का या प्रश्नावर बोलताना या यात्रेस प्रतिसाद मिळाल्याचे मला निश्चित समाधान आहे. राणी लंके यांनी सुपा जिल्हा परिषदेच्या सदस्या, जिल्हा नियोजन मंडळाच्या सदस्या तसेच पारनेर पंचायत समितीच्या उपसभापती म्हणून काम पाहिले आहे. त्यांच्या या कामाचा या यात्रेसाठी निश्चित फायदा झाल्यासारखा वाटतो.

## बाहेर असल्याने मेळाव्यास अनुपस्थित

महायुतीच्या मेळाव्याचे तुम्हाला निमंत्रण नव्हते का असे विचारले असता लंके म्हणाले, भाजपाचे दिलीपराव भालसिंग यांचा मला फोन आला होता. मात्र त्या दिवशी मी बाहेर असल्याने त्या मेळाव्यास येउ शकलो नाही असेही आ. लंके यांनी सांगितले.

## राणी लंके यांच्या विधानाचा विपर्यास

एकीकडे साखर, डाळ वाटप करीत निवडणूकीची तयारी सुरू केली जाते दुसरीकडे शिवस्वराज्य यात्रेच्या माध्यमातून राणी लंके निवडणूक लढविणार असे जाहिर करीत आहेत. या निवडणूकीत सरशी कोणाची होईल ? मी किंवा आमच्या कुटूंबातील कोणी असे जाहिर केले नाही. पाथर्डी येथील राणी लंके यांच्या वक्तव्याची आठवण करून दिली असता त्यांच्या विधानाचा विपर्यास केला गेल्याचे सांगत पक्षाच्या नेतृत्वाने संधी दिली निवडणूक लढवू असे त्यांचे म्हणणे होते अशी पुष्टीही लंके यांनी जोडली.

## मी काम करणारा कार्यकर्ता

साखर डाळ वाटून निवडणूकीची तयारी केली जात आहे. हे पहिल्यांदाच मतदारसंघात घडते आहे. त्याबाबत तुमची काय भावना आहे असे विचारले असता मी काम करणारा कार्यकर्ता आहे. कामाला महत्व देणारा कार्यकर्ता आहे. कोण काय करते आहे या गोष्टींकडे मी कधीच पाहिले नाही. आपण काम करीत असताना दुसरा काय करतो हे पाहण्यात वेळ खर्च करण्यापेक्षा आपण काय करायचे ? हे ठरविले पाहिजे असे लंके यांनी सांगितले.

## प्रत्येक घरात वेगळे मतप्रवाह

पाथर्डी येथे बोलताना राणीताई लंके यांनी लंके कुटूंबातील एक व्यक्ती लोकसभा निवडणूक लढविणार असल्याचे सांगितले होते. याची आठवण करून दिले असता. लंके म्हणाले, प्रत्येक घरामध्ये प्रत्येकाचा राजकारणाविषयी वेगवेगळा मतप्रवाह असतो. त्यामुळे राणी लंके यांनी तसे वक्तव्य केले असावे असे लंके म्हणाले.

# एक घास समाजासाठी; मराठा मोर्चातील पाच लाख आंदोलकांना जेवण

पारनेर सकल मराठा समाजाचे नियोजन; मोर्चाच्या स्वागताची जोरदार तयारी

पारनेर : प्रतिनिधी

**मराठा मोर्चातील तब्बल पाच लाख आंदोलकांना जेवण देण्याचे नियोजन पारनेर तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात येत आहे.**

एक घास समाजासाठी या उपक्रमांतर्गत तालुक्यातील प्रत्येक गावातून,प्रत्येक घरातून जेवणाची पाकिटे गोळा करण्यात येणार आहेत.संबधित गावांतील स्वयंसेवक जेवणाची पाकिटे सुपा येथे लावण्यात येणाऱ्या स्टॉलवरून आंदोलकांना वाटणार आहेत.तालुक्यातील प्रत्येक कुटुंबाने दोन चपात्या व एक सुकी भाजी,चटणी अशी किमान दहा पाकीटे तयार करून आपल्या गावातील स्वयंसेवकांकडे सुपूर्द करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.पाच लाख लिटर बाटलीबंद पाणी पुरवण्याचे नियोजन केले जात आहे.



■ सुपे येथे मराठा मोर्चाच्या स्वागतासाठी जोरदार तयारी सुरू आहे.

मराठा आरक्षणासाठी २० जानेवारी रोजी अंतरवली येथून निघणारा मोर्चा,२२ जानेवारी रोजी दुपारी बारा वाजता नगर -पुणे रस्त्यावर सुपे येथे पोहचणार आहे. मोर्चाच्या स्वागतासाठी पारनेर तालुका सकल मराठा समाजासह विविध समाजातील कार्यकर्त्यांनी जोरदार तयारी सुरू केली आहे.पारनेर व नगर तालुक्याच्या हद्दीवर,सुपे शिवारात मराठा संघर्ष योध्दा

उर्वरीत पान ३ वर



## संपादकीय

# विकासाची प्रचारमोहीम



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकास कामांच्या उद्घाटनाबाबत एक वेगळीच रीत अवलंबली आहे. विशेषत:, दुसऱ्यांदा शपथ घेतल्यानंतर ती अधिक प्रमाणात दिसून येत आहे. ती म्हणजे, एकाचवेळी अनेक योजनांचे उद्घाटन, भूमिपूजन, शिलान्यास किंवा निदान अंशत: परिचालन करायचे. अशा सगळ्या कामांची बेरीज शेकडो, काही वेळा हजारो कोटी रुपयांच्या घरात जाते. या सगळ्याचा एकत्रित परिणाम होत असतो. त्यातच, मोदी यांच्या स्वत:च्या आग्रहामुळे अनेक प्रलंबित योजना मार्गी लागल्या. त्यामुळे, मोदी यांनीच भूमिपूजन केलेल्या योजना पुऱ्या होऊन त्यांचे उद्घाटन करण्याचा योगही त्यांनाच येतो. त्यांच्या या धडाकेबाज आणि आग्रही कार्यपद्धतीमुळे कामे वेगाने पुरी होत आहेत.शुक्रवारी नरेंद्र मोदी जेव्हा महाराष्ट्रात आले; तेव्हा 'अटल सेतू'सारख्या महत्त्वाकांक्षी पुलाचे उद्घाटन तर झालेच; पण लोकसभेच्या निवडणुकांच्या प्रचाराचा नारळ न फोडताच फुटला आहे. नाशिकमधला 'रोड शो' किंवा नवी मुंबईतील सभास्थानी उघड्या गाडीतून स्वागताचा स्वीकार करीत येणे, ही प्रचार सुरू झाल्याची स्पष्ट खूण आहे. शुक्रवारचे कार्यक्रम पाहिले तर एकीकडे नाशिक या दक्षिण काशी म्हणविल्या जाणाऱ्या तीर्थस्थळी काळाराम मंदिरातील पूजन, भजन आणि काही तासांतच हजारो कोटींच्या योजनांचे उद्घाटन आणि भूमिपूजन; यातून मोदी यांनी एकाचवेळी दोन आघाड्या उघडल्या आहेत. तशा त्यांनी त्या या आधीच उघडल्या आहेत. कर्कश्श व कंठाळी भाषणे न करता एकीकडे हिंदुत्वाचा शिगोशीग परिवेष व आविष्कार आणि दुसरीकडे, जनसामान्यांच्या हिताच्या योजनांची बरसात, असे हे मोदी यांचे दुधारी शस्त्र आहे. आता लोकसभेच्या प्रचारात ते कसे सफाईने वापरायला हवे, याचे जणू प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिक मोदी यांनी शुक्रवारी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांना दिवसभर आपल्यासोबत ठेवून दिले आहे. अयोध्येतील प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमावर स्वाभिमानी बहिष्कार घालणारे विरोधक मोदींचा हा दुहेरी झंझावात कसा काय परतवणार आहेत, अशी शंका निर्माण करणारा हा शुक्रवारचा महाराष्ट्रदौरा होता.नरेंद्र मोदी यांचा जन्म १९५० चा आहे. ७३ वर्षांचे पंतप्रधान आणि नाशिकमध्ये युवा महोत्सवात त्यांच्यासमोर असणारी तरुणाई यांच्यात अडीच ते तीन पिढ्यांचे अंतर होते. इतके अंतर कापून संवाद साधणे सोपे नाही. पालकांनाही घरात ते जमत नाही. मात्र, मोदी यांनी 'हा नवीन भारत उद्या तुमच्या ताब्यात असणार आहे आणि तुमच्याचसाठी आज आम्ही तो घडवत आहोत,' असे म्हणून हे अंतर एकदम कापून टाकले. 'आई आणि बहीण यांच्यावरून एकमेकांना अपशब्द वापरू नका,' हा त्यांचा सल्ला घरातल्या एखाद्या वडीलधाऱ्यासारखा होता. तो त्यांनी यापूर्वीही एकदा जाहीरपणे दिला होता. हा सल्ला किती महत्त्वाचा आहे, हे रस्त्यावर कान उघडे ठेवून फिरणाऱ्या कुणालाही लगेचच पटेल. महाराष्ट्रातील नेत्यांनी तो ऐकला नसेल तर त्यांना या सल्ल्याची खास आठवण करून द्यायला हवी.महाराष्ट्रातील सामाजिक स्थिती आज चांगली नाही. अनेक प्रकारच्या संघर्षांनी ती चिघळत आहेत. काही दिवसांपूर्वी मोदी यांनी देशात तरुण, गरीब, महिला आणि शेतकरी या चारच जाती आहेत; असे म्हटले होते. भाजपची प्रचारमोहीम कशी असेल, याचा तो एक सांगावा होता. महाराष्ट्रात त्यांनी शुक्रवारी केलेली भाषणे या अंगाने पाहण्यासारखी होती. नाशिकचे भाषण तरुणांवर केंद्रित होते. ते तरुणांना 'इतिहास घडविण्याची' साद घालत होते. नवी मुंबईतील भाषणात महिलांचा खास आणि सविस्तर उल्लेख होता. महाराष्ट्र सरकारच्या महिलांसाठीच्या नव्या योजनांचे उद्घाटनही होते. मुंबईचा विकास हा एमएमआर म्हणजे मुंबई महानगर क्षेत्राचा नकाशा डोळ्यांसमोर ठेवूनच व्हायला हवा; इतकेच नव्हे तर, या भागाची उर्वरित महाराष्ट्राशी जोडणी व्हायला हवी. तसे झाले तरच विकासाची जी मोजकी बेटे तयार झाली आहेत, त्यांचा विस्तार होऊ शकेल. त्या दृष्टीने 'अटल सेतू'च्या वेगवान कामाचे कौतुक करायला हवे. हा प्रकल्प अनेक वर्षे रखडला होता. रखडलेले प्रकल्प आम्ही मार्गी लावले, हा पंतप्रधानांचा दावा विरोधकांना उदाहरणे देऊन खोडून काढावा लागेल. मोदी यांनी या भाषणात रखडलेल्या आणि आता पुऱ्या झालेल्या निळवंडे धरण प्रकल्पाचा उल्लेख केला. निळवंडे धरण आणि त्याचे कालवे यांची कथा महाराष्ट्रात तीन पिढ्यांना माहीत होती. मोदी हे एकाच वेळी अनेक आघाड्या उघडतात. काळाराम मंदिरात 'आता राममंदिर खुले होत असताना देशातील सगळी देवस्थाने स्वच्छ करा', असे सांगून त्यांनी जो झाडू हातात घेतला, ती एक नवीनच आघाडी होती. युद्धातल्या 'कार्पेट बॉंबिंग'सारखे मोदी एकही जागा रिकामी सोडत नाहीत. राज्यातल्या सर्व विरोधकांनी वेगाने एकत्र येऊन आणि राज्यातले शेतकऱ्यांसहित सारे प्रश्न पुढे आणून दमदार प्रचाराला लागण्याची हीच वेळ आहे. आता एकेक दिवस मोलाचा आहे.

# हवा 'व्हायब्रंट भारत'

औद्योगिकरणाच्या विकेंद्रीकरणावर भर दिला पाहिजे. गुजरातसाठी पुढाकार घेणाऱ्या पंतप्रधानांची सक्रियता अन्य राज्यातल्या अशा स्वरुपाच्या उपक्रमात ठळकपणे दिसावी.भारतीय अर्थव्यवस्थेचे आशादायी चित्र विविध आकडेवारीतून समोर येत आहे. विशेषतः देशाच्या आर्थिक विकासाचा दर जगात आघाडीवर असेल. अमेरिका, युरोपातील अनेक अर्थव्यवस्थांसह चीनचा विकासदर मंदावत असताना त्याबाबत भारताकडे आशेने पाहिले जात आहे. त्या पार्श्वभूमीवर ऐतिहासिक संधीचा फायदा उठवायचा असेल तर सर्व देशाला एकवटून प्रयत्न करावे लागतील.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहाव्या ऋव्हायब्रंट गुजरात'च्या उद्घाटनाच्यावेळी केलेले भाषण त्यादृष्टीने देशाच्या अर्थकारणाच्या वाटचालीची दिशा स्पष्ट करणारे असले तरी उद्योजकतेचा विकास आपण कशा रीतीने करतो, त्यासाठी धोरणात्मक पाठबळ कसे देतो, हे जास्त महत्त्वाचे ठरेल.व्यक्तिकेंद्रित विकास, प्रगत तंत्रज्ञानाचा अंगीकार, पर्यावरणपुरकता हे मुद्दे पंतप्रधानांनी सांगितले; पण या सगळ्याला प्रत्यक्ष गुंतवणुकीची जोड मिळाली तर औद्योगिक विकासाचे स्वप्न सगुण-साकार होऊ शकेल. 'व्हायब्रंट गुजरात'च्या निमित्ताने मुकेश अंबानी, गौतम अदानी, लक्ष्मी मित्तल, टाटा समूहाचे चंद्रशेखरन आदी प्रसिद्ध उद्योगपतींनी काही लाख कोटींची गुंतवणूक गुजरातेत करण्याची तोंडभरून आश्वासने दिली खरी; परंतु त्यापैकी किती प्रत्यक्षात येते, हे पाहायचे.राजकीय क्षेत्र सध्या भाषा, प्रांत, जात, धर्म अशा एक ना अनेक अस्मितांच्या कल्लोळाने गजबजलेले आहे. हे वातावरण आर्थिक-औद्योगिक विकासाला मारक



ठरते, हा अनुभव जगभरच येतो. त्या पार्श्वभूमीवर निदान उद्योगपती त्या सापळ्यात अडकणार नाहीत, अशी अपेक्षा असते. मुळात भाषा, प्रांत अशी स्वरुपांच्या कुंपणांनी उद्योगाच्या विस्ताराला मर्यादा येतात.रिलायन्स समूहाचा मोठा विस्तार ज्यांनी केला, त्या उद्योगपती मुकेश अंबानी यांना तर ही गोष्ट चांगलीच माहिती असणार. तरीही त्यांना भाषणात 'आम्ही गुजरातीच आहोत,' असे का सांगावेसे वाटले, हा एक प्रश्नच आहे. 'व्हायब्रंट गुजरात'चे स्वागत करतानाच देशाला आस आहे ती 'व्हायब्रंट इंडिया'ची याचे भान कधीही विसरता कामा नये.काही दिवसांपूर्वीच तमिळनाडूमध्ये अशाच स्वरुपाच्या झालेल्या जागतिक गुंतवणूक परिषदेत पावणेदोनशेच्या आसपास करारमदार आणि सहा लाख कोटींवर गुंतवणुकीची तयारी दाखवली गेली. पश्चिम बंगालमध्ये नोव्हेंबरमध्ये झालेल्या गुंतवणूक परिषदेत दीडशेवर करारमदार आणि पावणेचार लाख कोटी रुपयांवर गुंतवणूक होणार असल्याचे जाहीर करण्यात आले.देशात आघाडीवरील महाराष्ट्रासह अनेक राज्यांनी आगामी काही वर्षांत 'ट्रिलियन डॉलर' अर्थव्यवस्था होण्यासाठी कंबर कसली आहे. 'व्हायब्रंट गुजरात'मध्ये बोलताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आगामी पाच-सहा वर्षांत पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था होऊन भारत जगातील तिसरी अर्थसत्ता होईल, असा दावा केला.पण त्यासाठी मोठ्या प्रमाणात देशांतर्गत उद्योजकांसह परदेशातून गुंतवणुकीचा ओघ वाढणे, रोजगारनिर्मिती यांची गरज आहे. उद्योगस्नेही वातावरण, ईझ ऑफ डुईंगमध्ये आघाडी, जमिनींपासून पायाभूत सुविधांचा विकास, उद्योगस्नेही कामगार कायदे, अधिकाधिक सरकारी परवाना प्रक्रिया सुटसुटीत करणे अशा त्यासाठीच्या मूलभूत सुविधांकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे.महाराष्ट्रात मुंबई-पुणे-नाशिक त्रिकोणात विकास एकवटला आहे; मराठवाडा, विदर्भ पिछाडीवर आहे. त्याचप्रमाणे उत्तरेतील बिहार, झारखंड, उत्तर प्रदेशसह ईशान्येतील अनेक राज्ये औद्योगिकीकरणात मागास आहेत. तिथे पायाभूत सुविधांची वानवा आहे. ती दूर करावी. तेथून मोठ्या प्रमाणात रोजगारासाठी स्थलांतर वाढते आहे. आर्थिक महासत्ता बनवण्यासाठी पंतप्रधानांचे धोरण काटेकोरपणे अंमलात आणले पाहिजे.औद्योगिकरणाच्या विकेंद्रीकरणावर भर दिला पाहिजे. त्यासाठी गुजरातसाठी पुढाकार घेणाऱ्या पंतप्रधानांची सक्रियता अन्य राज्यातल्या अशा स्वरुपाच्या उपक्रमात ठळकपणे दिसावी, ही अपेक्षा आहे. तमिळनाडू, पश्चिम बंगाल, ओडिशा, कर्नाटक, तेलंगण यांनी गेल्या काही वर्षांत गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी घेतलेल्या पुढाकाराला केंद्राने आणखी बळ द्यावे. देशात महाराष्ट्र परकी गुंतवणूक आणि औद्योगिक आघाडीवर अव्वल क्रमांक टिकवून आहे.तथापि गेल्या दोन-तीन वर्षांत महाराष्ट्रात होऊ घातलेले अनेक प्रकल्प, उद्योगपार्क गुजरातमध्ये हलवले गेले. महाराष्ट्राची केंद्रातील सत्ताधाऱ्यांकडून उपेक्षा होते, ही सार्वत्रिक भावना आहे. ती दूर करण्याचे प्रयत्न होताना दिसत नाहीत. त्याऐवजी त्याचे राजकारणच अधिक होते. देशातील अन्य राज्ये औद्योगिकरणासाठी धडपडत असताना आपणही आपली आघाडी टिकवलीच पाहिजे..

# असंघटित कामगार उपेक्षेचे धनी!

असंघटित कामगारांचे तब्बल ९३ टक्क्यांच्यावर असलेले प्रमाण पाहता, एवढ्या मोठ्या कामगार वर्गाच्या वेतन, वेतनेतर लाभ आणि सामाजिक सुरक्षा उपायांची योग्य ती खबरदारी घेणे आर्थिक विकासासाठी महत्त्वाचे आहे.देशातील एकूण कामगारांपैकी उत्पादनाच्या क्षेत्रात मूलभूत भूमिका बजावणारा असंघटित कामगार अजूनही धोरणात्मक प्रक्रियेतील काहीसा दुर्लक्षित घटक असल्याचेच दिसते. खासगीकरणाच्या वेगाने होणाऱ्या प्रक्रियेमुळे देशाच्या विविध क्षेत्रांतील रोजगाराच्या कायम आणि संघटित स्वरुपाकडून कंत्राटी, रोजंदारीवरील तात्पुरत्या किंवा विनाअनुदान अशा असंघटित स्वरूपाकडे वेगाने होणाऱ्या रुपांतरामुळे देशातील श्रमशक्तीसमोर रोजगार आणि वेतनाचे असंख्य प्रश्न आ वासून उभे राहत आहेत.असंघटित कामगारांचे तब्बल ९३ टक्क्यांच्यावर असलेले प्रमाण पाहता, एवढ्या मोठ्या कामगार वर्गाच्या वेतन, वेतनेतर लाभ आणि सामाजिक सुरक्षा उपायांची योग्य ती खबरदारी घेणे आर्थिक विकासासाठी महत्त्वाचे आहे. मात्र आजही देशातील असंघटित कामगारांसमोरील वेतन आणि वेतनेतर लाभाचे प्रश्न सुटलेले नाहीत.केंद्र सरकारने २०१९ मध्ये वेतन अधिनियम (थरसश उेवश) २०१९ लागू केला असून कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा उपायांच्या अनुषंगाने विविध योजनादेखील सुरु केलेल्या आहेत. मात्र, प्रभावी अंमलबजावणीअभावी त्याचे निर्धारित लाभ या कामगारवर्गापर्यंत पोहोचत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.केंद्र सरकारद्वारे प्रकाशित केल्या जाणाऱ्या २०२१-२२ च्या नियमित श्रमशक्ती अहवालानुसार देशातील स्वयं-रोजगार आणि किरकोळ स्वरूपाच्या कामगारांच्या प्रमाणात वाढ झाली असून, सध्या देशात स्वयं-रोजगारावरील कामगारांचे प्रमाण ५५.८ टक्के इतके तर किरकोळ कामगारांचे प्रमाण २२.७ टक्के एवढे आहे. ग्रामीण भागातील या कामगारांचे प्रमाण अनुक्रमे ६१.५ टक्के आणि २६ टक्के एवढे लक्षणीय असल्याचे चित्र आहे. यावरून देशात स्वयं-रोजगार आणि किरकोळ अशा दोन्ही प्रकारच्या कामगारांचे एकूण प्रमाण हे ७९ टक्क्यांच्या जवळपास असून त्यांचे वेतन हे किमान वेतनपातळीपेक्षा कमी आहे. तर उर्वरित १४ टक्के कामगार नियमित वेतनावर काम करणारे असले तरी त्यांची वेतनपातळी किमान वेतनपातळीपेक्षा फार अधिक आहे, असे म्हणता येणार नाही.



### वेतनपातळी तळाशी

नियमित श्रमशक्ती अहवालात (२०२१-२२) कामगारांच्या नमूद केलेल्या मिळकतीचा विचार करता, ग्रामीण भागातील स्वयं-रोजगारावरील कामगारांचे मासिक सरासरी वेतन केवळ ८.१ हजार तर शहरी भागातील अशा कामगारांचे वेतन १३ हजार रुपयांच्या घरात आहे. दुसरीकडे, देशाच्या ग्रामीण भागातील किरकोळ कामगारांची दैनिक सरासरी मजुरी ३२४ रुपये तर शहरी भागातील कामगारांची ३९५ रुपये एवढी असल्याचे चित्र आहे.या कामगारांच्या मासिक वेतनाचा विचार करता, ते १० हजार रुपयापेक्षा जास्त नसल्याचे स्पष्ट आहे. यावरुन देशाच्या ग्रामीण असो की शहरी असंघटीत कामगारांना मिळणारे वेतन हे किमान वेतन पातळीपेक्षा खूप असल्याचे पाहायला मिळते.दुसरीकडे, खुद्द केंद्र आणि राज्य सरकारद्वारे राबविल्या जाणाऱ्या म.गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेवरील (मनरेगा) कामगारांची सरासरी दैनिक मजुरी रु. २३७.४५ एवढी असल्याचे तर केंद्र सरकारनिर्धारित शेतमजुरांची सरासरी दैनिक मजुरी रु. ३१२ इतकी आहे.याशिवाय बांधकाम, कारखाने, दुकाने, हॉटेल याठिकाणी रोजंदारीवर काम करणारे कामगार असोत वा शैक्षणिक क्षेत्रात तासिका तत्वावर काम करणारे शिक्षक सर्वांना मिळणारे सरासरी वेतन प्रतिमहिना १० ते १२ हजारांच्या घरात असून किमान वेतनपातळीपेक्षा कमी असल्याचेच दिसून येते. त्यातच या कामगारांनी केलेल्या अतिरिक्त कामाची ना कुठे नोंद ठेवली जाते ना त्या कामाची अतिरिक्त मजुरी मिळते. पेन्शन, पगारी रजा, विमा यासारखे सामाजिक सुरक्षा उपाय तर दूरच.वास्तविकत: अर्थव्यवस्थेच्या निरनिराळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारवर्गाला योग्य प्रमाणात वेतन व वेतनेतर लाभ मिळावेत, यादृष्टीने सरकारी पातळीवर वेळोवेळी कामगार कायदे आणि अधिनियम करण्यात आलेले आहेत. २०१९ मध्ये केंद्र सरकारने देशातील कामगारांसाठी लागू केलेल्या वेतन अधिनियम (थरसश उेवश), २०१९ नुसार, कोणत्याही क्षेत्रातील रोजंदारी, कंत्राटी, किंवा कायमस्वरूपी असलेल्या कुशल, अर्ध-कुशल किंवा अकुशल अशा सर्व प्रकारच्या कामगारांना 'किमान वेतन समिती'ने निर्धारित केलेल्या किमान वेतनापेक्षा कमी वेतन देण्यात येऊ नये, अशी तरतूद करण्यात आलेली आहे.तसेच, जे कामगार आपल्या निर्धारित वेळेपेक्षा जास्त वेळ काम करत असतील त्यांना अतिरिक्त वेळेचा मोबदला देण्यात यावा, अशीही तरतूद आहे. प्रत्यक्षात असे होताना दिसत नाही. कामगार कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीअभावी असंघटित कामगारांचे वेतन हे किमान वेतनपातळीपेक्षा कमी असतेच; शिवाय अतिरिक्त कामाची नोंदही होत नाही, हे खरे.

### राहणीमान खर्चाचा विचार

देशातील विविध राज्ये कुशल, अर्धकुशल आणि अकुशल अशा विविध प्रकारच्या कामगारांसाठी राहणीमानखर्चाची पातळी लक्षात घेऊन किमान वेतनपातळी निश्चित करत असतात. यामध्ये महाराष्ट्राची किमान वेतनपातळी पाहता, ती १२ हजार ते १३ हजार रुपयांच्या दरम्यान असल्याचेच दिसून येते.मात्र अशा प्रकारे किमान वेतनपातळी निर्धारित करत असताना कामगारांच्या वास्तव राहणीमान खर्चाचा विचार केला जातो का, हा प्रश्न आहे. परिणामी कामगारांना मिळणारे वेतन आणि राहणीमानखर्च यातील तुटीचा कायम सामना करावा लागतो.एकीकडे, देशातील तब्बल ९३ टक्क्यांच्यावर प्रमाण असलेल्या कामगारवर्गाच्या वेतन पातळीचे असे वास्तव असताना दुसरीकडे संघटित कामगार असोत की जनसेवक म्हटले जाणारे आमदार, खासदार असोत; त्यांना मिळणाऱ्या वेतन आणि वेतनेतर लाभांचे प्रमाण भरघोस असून ठराविक कालखंडानंतर त्यात वाढ करण्याची कायदेशीर तरतूद असल्याचेही पाहायला मिळते.तर विविध क्षेत्रांतील उद्योग आणि व्यवसायसंस्था हजारो कोटींच्या नफ्याची उच्चांकी नोंद करत असताना तो नफा शेवटच्या कामगारापर्यंत झिरपत नाही, हेही कटू सत्य आहे. खरंतर आज भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश म्हणून पुढे येत असताना हाताला काम मागणाऱ्यांची संख्या वेगाने वाढत आहे.अशा स्थितीत या कामगारांच्या हाताला दिले जाणारे काम आणि मिळणारे वेतन व वेतनेतर लाभ हे समन्यायी राहतील, याची काळजी घेणे गरजेचे आहे. याचे कारण कामगार हा आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील मूलभूत घटक असून श्रमाचा योग्य मोबदला मिळत असेल तर श्रमाची उत्पादकता आणि उत्पादनवाढ होऊन आर्थिक विकासाची प्रक्रिया गतिमान होण्यास मदत होते.त्यादृष्टीने जगातील विकसित देश कामगारांची वेतनपातळी ही श्रमउत्पादकतेला चालना देणारी असल्याचे पाहायला मिळते. भारतातही महाकाय संख्येने काम करणाऱ्या असंघटित क्षेत्रातील कामगारांना कामाचा योग्य प्रमाणात मोबदला दिला गेल्यास देशातील श्रमउत्पादकता आणि उत्पादन वाढीस लागून आर्थिक विकासाला गती मिळेल, हे नक्की.

### हे करायला हवे

दिले जाणारे काम आणि वेतन व वेतनेतर लाभ हे समन्यायी असावेत.

मोठ्या कंपन्यांचा नफा तळच्या कामगारवर्गापर्यंत झिरपला पाहिजे.

श्रमउत्पादकतेला चालना देणारी वेतनपातळी असायला हवी.

वेतनपातळी ठरवताना राहणीमान खर्चाचा विचार आवश्यक.

# स्वच्छतेची जीवनशैली

स्वच्छतेसाठी स्पर्धा, प्रलोभन या गोष्टींचा वापर करावा लागणे, हीच गोष्ट मुदलातच खूप बोलकी आहे. परंतु सार्वजनिक स्वच्छतेच्या बाबतीत अद्याप आपल्याला एवढी मजल मारायची आहे, की अशा सर्व प्रकारचे प्रयत्न करण्याशिवाय पर्यायही नाही. पण जोपर्यंत 'सार्वजनिक स्वच्छता' प्रत्येकाच्या अंगवळणी पडत नाही, त्याची संस्कृती निर्माण होत नाही तोवर हा प्रश्न भेडसावत राहील, याचे भान विसरता कामा नये.'स्वच्छ भारत अभियानां'तर्गत कामगिरी बजावलेल्या शहरांच्या आणि राज्यांच्या यादीवर नजर टाकल्यास स्वच्छतेच्या बाबतीत महाराष्ट्रासह काही राज्ये प्रगती करताना दिसताहेत, ही आनंदीचा बाब. अभियानाला सुरवात झाली तेव्हा शंभरच्या आत शहरांचा सहभाग होता. अभियानाच्या विविध गटातील सहभागी शहरांचा आकडा पाच हजारापार गेला, हे उल्लेखनीय.पश्चिम बंगालमधील शहरे स्वच्छतेत सुमार ठरली असली तरी त्यांचे स्पर्धेत पहिल्यांदाच उतरणे हेही महत्त्वाचे. गेली सलग सात वर्षे देशात स्वच्छतेत अव्वल ठरलेल्या इंदूरने मारलेली बाजी आणि स्वच्छतेचा जीवनशैली म्हणून केलेला अंगीकार अनुकरणीय आहे. तीन दशकांपूर्वी सुरतमध्ये प्लेगचे साथ आली होती. त्या सुरतने इंदूरच्या बरोबरीने स्वच्छतेत घेतलेली आघाडी नागरिक आणि प्रशासनाच्या प्रयत्नांच्या ध्यासाची साक्ष देते.या यादीत नवी मुंबई, पुणे, सासवड, लोणावळा, कराड, विटा, सिल्लोड, पाचगणी, देवळाली अशा कितीतरी गावांनी बजावलेली कामगिरी महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे. महत्त्वाचे म्हणजे, स्वच्छतेत राज्याच्या गटात महाराष्ट्राचे अव्वल ठरणे हुरूप वाढवणारे आहे.सुमारे आठ वर्षांपूर्वी देशव्यापी स्वच्छता अभियान सुरू करताना सरकारने दूरगामी उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवली होती. समाजातील सर्व घटकांत स्वच्छतेबाबत जाणीव जागृती निर्माण करणे आणि त्याला व्यापक चळवळीचे रूप देऊन लोकसहभाग वाढवायचा होता. स्वच्छतेबाबत गावखेड्यापासून ते महानगरांपर्यंतच्या पातळीवर स्पर्धात्मक वातावरण निर्माण करून त्या-त्या भागातील स्वच्छता आणि आरोग्य यांचे संवर्धन करणे हादेखील हेतू होता.या कामगिरीचे मोजमाप करण्यासाठी थेट त्या भागाची पाहणी आणि जनतेचा त्याबाबतचा अभिप्राय आणि इतर निकषांचा वापर केला. या सगळ्यांमुळे स्वच्छता ही जीवनशैली बनली, ही जमेची बाजू म्हणावी लागेल. सुरतमधील प्लेगच्या साथीनंतर स्वच्छतेवर अधिक भर देऊन दारोदारी कचरा संकलक घंटागाड्या पाठवणे आणि त्यानंतर संकलित कचऱ्यावर प्रक्रिया यासाठी स्थानिक प्रशासनांनी आतापर्यंत अनेक प्रयोग केले.सरलेल्या वर्षात 'कचऱ्यातून संपत्तीनिर्मिती' हे अभियानाचे ध्येय होते. त्यात बऱ्यापैकी यश आले आहे. देशात अव्वल ठरलेल्या महाराष्ट्रापुरते बोलायचे तर ८९टक्के घरांतून कचरासंकलन, त्याचे उगमापाशीच ६७ टक्के वर्गीकरण होत असल्याचे आढळले. राज्यात चांगली कामगिरी करणारी शहरे त्यामुळेच स्वच्छतेत आघाडी घेऊ शकली आहेत.शहरे स्वच्छ झाली तरी त्यातून निर्माण होणाऱ्यावर कचऱ्यावर प्रक्रिया हे मोठे आव्हान असते. ज्या भागात तो टाकला जातो आणि जिथे त्यावर प्रक्रिया होते, त्या भागातून होणारा विरोध पुणे, औरंगाबाद, नाशिकसह अनेक शहरांनी अनुभवला आहे. त्यातून प्रदूषणासह आरोग्यावर विपरित परिणामांपर्यंत नवनवे प्रश्नही जन्माला आले आहेत.तथापि, २०१४मध्ये १५-१६टक्के कचऱ्यावर शास्त्रीय पद्धतीने प्रक्रिया व्हायची. हे प्रमाण आता ७६ टक्क्यांवर पोचले आहे. आगामी काळात सगळ्याच कचऱ्यावर शास्त्रीय पद्धतीने प्रक्रियेचे उद्दिष्ट असल्याचे नागरविकास मंत्री हरदीपसिंह पुरी यांनी सांगितले. ही या अभियानाची यशस्वीता म्हटली पाहिजे.चालू वर्षासाठी 'रिड्युस, रियुज आणि रिसायकल' म्हणजे कचऱ्याची कमीतकमी निर्मिती करणे, कचऱ्यातील वस्तूंचा पुनर्वापर करणे आणि कचऱ्यातून टिकाऊ वस्तूंची निर्मिती हे अभियानाचे ध्येय असेल. साऱ्या जगभरच या सूत्राचा अधिकाधिक अंगीकार होतो आहे. वस्तूनिर्मिती कंपन्याही आपल्या उत्पादनातूनही हे काही प्रमाणात राबवत आहेत.कोरोनाच्या महासाथीमध्ये स्वच्छतेचे महत्त्व आणि जीवनशैली म्हणून त्याचा स्वीकार किती महत्त्वाचा आहे, हे अधोरेखित झाले आहे. त्यामुळेच स्वच्छता अभियान सरकारी मोहीम आहे आणि त्याचे दायित्व स्थानिक स्वराज्य संस्थांचेच आहे, या मानसिकतेतून नागरिकांनी बाहेर पडल्याशिवाय त्याचे जीवनशैलीत रूपांतर होणार नाही.भूमिगत गटारे साफ करणाऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधून त्या कामाच्या यांत्रिकीकरणाची सूचना राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी नुकतीच केली. या बाबतीत तातडीने कार्यवाही व्हावी, हे सर्वच अर्थांनी आवश्यक आहे;विशेषतः मानवतेच्या. आजही सन्मानास पात्र शहरांना कचऱ्याचे ढीग, रस्त्यांवर उडणारा कचरा, श्वानांच्या विष्ठांसह रंगलेल्या भिंती, दुर्गंधीने नाक मुठीत धरून जावी लागणारी स्वच्छतागृहे आहेत, हे नग्न वास्तवही नाकारता येत नाही. त्यामुळेच पुरस्काराने कौतुकाची झूल अंगावर चढली असली तरी सार्वजनिक स्वच्छतेच्या बाबतीत अद्यापही जाणवणारा दिव्याखालचा अंधार दूर केला पाहिजे.

## शॉर्ट न्यूज

### रब्बीचे आवर्तन तातडीने सुरू करा

■ **श्रीरामपूर :** विधानसभा मतदार संघासाठी रब्बीचे आवर्तन तातडीने सुरू करावे, अशी मागणी आमदार लहू कानडे यांनी पालकमंत्री विखे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. सध्या शेतातील पिकांना पाण्याची नितांत आवश्यकता आहे. विजेच्या लपंडावामुळे पिकांना पुरेसे पाणी देता येत नाही. त्यामुळे पिके सुकून चालली आहेत. येत्या चार ते पाच दिवसांत पिकांना पाणी न मिळाल्यास पिके जळून शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे. तेव्हा तातडीने आवर्तन सुरू करण्याच्या सूचना तात्काळ देण्यात याव्यात, अशी मागणी आ. लहू कानडे यांनी पत्राद्वारे केली आहे.

### केंद्रस्तरीय स्पर्धेत म्हसोबानगर शाळेचे यश

■ **श्रीगोंदा :** तालुक्यातील कौठा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत नुकत्याच झालेल्या केंद्रस्तरीय विविध गुणदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रमात विविध स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या होत्या. या स्पर्धेत म्हसोबानगर शाळेच्या मुलांनी घवघवीत यश संपादित केले. वक्तृत्व स्पर्धेत किलबिल गटात स्वरा सुनील पवार हिने प्रथम क्रमांक मिळविला, बालगटात द्वितीय क्रमांक प्रणव शिवाजी सुपेकर याने मिळविला. वेशभूषा सादरीकरण किलबिल गटात द्वितीय क्रमांक गौरव सुनील पवार, हस्ताक्षर स्पर्धा किलबिल गट तृतीय क्रमांक प्रिया सकट हिने मिळविला.

### जन्मशताब्दी महोत्सव ठरला संस्मरणीय

■ **संगमनेर :** काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते, आमदार बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली थोर स्वातंत्र्यसेनानी सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात व हरितक्रांतीचे प्रणेते डॉ. अण्णासाहेब शिंदे यांच्या जन्मशताब्दी महोत्सव संस्मरणीय ठरला. महोत्सवानिमित्त झालेल्या विविध कार्यक्रमांसाठी राज्यभरातून मान्यवरांनी हजेरी लावली. प्रत्येक कार्यक्रम प्रसंगी तरुण, महिला व अबाल वृद्धांसह बालगोपाळांची मोठी उपस्थिती होती. शिस्तबद्ध व दर्जेदार कार्यक्रमामुळे हा जयंती महोत्सव संस्मरणीय ठरला.

### निसर्ग संवर्धनासाठी जागृतीची गरज

■ **अकोले :** जीवनाचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे निसर्ग संवर्धनासाठी जाणीव जागृतीची आवश्यकता आहे. असे प्रतिपादन राजुर येथील ॲड. एम. एन. देशमुख महाविद्यालयाचे विद्यमान प्राचार्य डॉ. भाऊसाहेब देशमुख यांनी प्रतिपादन केले. महाराष्ट्र राज्य उच्च तंत्र शिक्षण विभाग आणि ॲड. एम. एन. देशमुख महाविद्यालयातील निसर्ग संवर्धन विभाग यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ग्रीन क्लब स्थापना कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

### विविध विकास कामांचा शुभारंभ संपन्न

■ **नगर :** बदलत्या काळाप्रमाणे शहराच्या विकासाचे पुढील ५० वर्षाचे नियोजन करून व दूरदृष्टी ठेवून विकासाचे कामे हाती घेतली असून विकसित शहर निर्माण करायचे आहे, बुरुडगाव हे नगर शहर विधानसभा मतदार संघात असून या गावच्या विकासासाठी गेल्या दहा वर्षांमध्ये मोठा निधी प्राप्त करून दिला असल्यामुळे गावाला शहरीकरणाचे रूप प्राप्त झाले आहे, विकासाची एकदा केलेली कामे पुन्हा पुन्हा करण्याची वेळ आपल्यावर येऊ नये यासाठीचे नियोजन केले जाते, नाही तर यामध्येच नगरसेवक, सरपंच, सदस्य यांना अडकून पडावे लागते.

# शिक्षक परिषदेच्या नेतेपदी डावखरे, जिल्हाध्यक्षपदी खामकर

## आ.संजय केळकर यांच्या उपस्थितीत फेरबदल




◣ **नगर : प्रतिनिधी**


**जिल्ह्यातील शिक्षक परिषदेचे नेते रावसाहेब रोहोकलेंसह त्यांच्या शिलेदारांनी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या थोरात गटात जाण्याच्या हालचाली सुरू केल्यानंतर, शिक्षक परिषदेच्या जिल्हा कार्यकारिणीत फेरबदल करण्यात आले आहेत. त्यानुसार परिषदेच्या शिक्षक नेते पदी विकास डावखरे तर जिल्हाध्यक्षपदी संतोष खामकर यांची निवड करण्यात आली.**

राज्य कार्यकारिणीच्या ठाणे येथे झालेल्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे संस्थापक आमदार संजय केळकर होते. यावेळी राज्याध्यक्ष राजेश सुर्वे, विभागीय अध्यक्ष राजेंद्र जायभाय उपस्थित होते. रोहोकले यांनी अद्याप परिषद सोडल्याची अधिकृत घोषणा केली नसली, तरी ते या बैठकीला उपस्थित नव्हते.
बैठकीमध्ये अहमदनगर जिल्ह्यासाठी नव्याने जिल्हा कार्यकारणी निश्चित करण्यात आली. शिक्षक नेतेपदी नव्याने विकास डावखरे, जिल्हाध्यक्षपदी संतोष खामकर, कार्यकारी अध्यक्ष दशरथ ढोले, उत्तर विभागीय अध्यक्षपदी राजेंद्र पटेकर, सरचिटणीस पदी दत्तात्रय गवळी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# बोरा महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

## ■ स्पर्धेचे यंदाचे ३७ वे वर्ष ■ प्रा.बाळकृष्ण लळीत यांची माहिती

◣ **शिरूर : प्रतिनिधी**



**शिरूर येथील चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालयाच्या वतीने येत्या १९ जानेवारीला सकाळी १० वाजता छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय अंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती वरिष्ठ महाविद्यालयाचे समन्वयक प्रा. बाळकृष्ण लळीत यांनी दिली.**

एक महान सेनानी, धुरंधर राज्यकर्ता, साहित्य व ज्ञानाचे उपासक असणाऱ्या ज्वलनतेजस छत्रपती संभाजीराजांच्या कार्यातून प्रेरणा घेण्यासाठी छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वाद- विवाद व उत्स्फूर्त वक्तृत्त्व स्पर्धा प्रतिवर्षी चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालयातर्फे आयोजित केली जाते. महाविद्यालयाने सुवर्ण महोत्सवी वर्ष पूर्ण केले आहे.

रौप्य महोत्सव पार केलेल्या या प्रतिष्ठित स्पर्धेचे यंदाचे ३७ वे वर्ष आहे. ज्ञानधिष्ठित क्रियाशील समाज निर्मितीसाठी वाचन, चिंतन, वैचारिक मंथन, चर्चा, वक्तृत्त्व वाद-विवाद इ. माध्यमांची नितांत गरज असते. आजचा महाविद्यालयीन युवक हा वर्तमान व भविष्याचा प्रतिनिधी आहे. त्याच्यातील सामाजिकतेचे भान व प्रश्नांची जाण समाजाला व्हावी हा या स्पर्धेच्या आयोजनामागील प्रमुख उद्देश आहे.

प्रत्येक महाविद्यालयास दोन विद्यार्थ्यांचा एक याप्रमाणे जास्तीत जास्त २ संघ पाठवता येतील. संघातील एक स्पर्धकाने प्रस्तावाच्या अनुकूल तर दुसऱ्याने प्रतिकूल बाजूने बोलावे.
प्रवेशिकेत नमूद बाजू ऐनवेळी बदलता येणार नाही. या स्पर्धेसाठी वेळ मर्यादा ८ मिनिटे (६+२) राहील. एक संघासाठी प्रवेश शुल्क रु. १००/- राहील. प्रवेश शुल्क दि. १९/०१/२०२४ स्पर्धेच्या दिवशी सकाळी ८ ते १० या वेळेत भरावे, असे आवाहन संयोजक समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

# नगरमध्ये २५ लाख मराठे येण्याचा अंदाज

## पदयात्रेचे प्रशासकीय पातळीवर नियोजन

◣ **नगर : प्रतिनिधी**



**मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या पदयात्रेचे प्रशासकीय पातळीवर नियोजन करण्यात येत आहे. प्रत्येक पाच किलोमीटर अंतरावर पोलीस तैनात करण्यात येणार आहे. सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात येणार आहे, अशी माहिती अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांनी दिली.**

अपर पोलीस अधीक्षक खैरे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच तोफखाना पोलीस ठाण्यात मराठा बांधव व पोलीस अधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीत जरांगे पाटील यांच्या नगर मार्गे जाणाऱ्या पदयात्रेच्या नियोजनाबाबत चर्चा करण्यात आली.

ही पदयात्रा पाथर्डी मार्गे नगर शहरात प्रवेश करणार आहे. या पदयात्रेत २५ लाख मराठा बांधव सहभागी होतील, असा अंदाज आहे. त्या अनुषंगाने नगर सकल मराठा समाजाच्या वतीने नियोजन करण्यात आले आहे. प्रत्येक तालुक्यातील स्वयंसेवक मदतीसाठी नगर शहरात येणार आहेत. मराठा बांधवांसाठी पिण्याचे पाणी, भोजन आणि मुक्कामाची व्यवस्था करण्यात येत आहे. नगर पाथर्डी रोडवरील बारा बाभळी परिसरात मोकळ्या जागेत मुक्कामाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

## वाचकांच्या लेखणीतून

# उस्ताद राशिद ख़ान यांचा पैगंबरवास

गेल्या ९ जानेवारी रोजी उदयोन्मुख हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत गायक राशिद ख़ान कोलकाता येथे वयाच्या ५५ व्या वर्षी प्रोटेस्ट कॅन्सरने मृत्यू पावले. ते रामपूर सहसवान घराण्याचे मशहूर गायक होते. त्यांचा अकाली मृत्यू ही मोठीच दुर्दैवी घटना म्हणावी लागेल. उस्ताद राशिद ख़ान यांचे शास्त्रीय संगीत ऐकून माझ्यानंतर हाच.... असा विश्वास पंडित भीमसेन जोशी यांनी व्यक्त केला होता.
याद पिया की आये...ही प्रसिद्ध ठुमरी उस्ताद बड़े ग़ुलाम अली ख़ान, शोभा गुर्टू, वडाली बंधू, कौशिकी चक्रवर्ती आदी महान गायक आणि गायिकांनी गायलेली आहे. तीच ठुमरी उस्ताद राशिद ख़ान यांच्या कसदार आणि मधुर आवाजात ऐकणे एक वेगळाच अनुभव आणि दिव्य आनंद असे.
उस्ताद राशिद ख़ान यांचा जन्म १ जुलै १९६८ रोजी उत्तर प्रदेशातील बदायून येथे झाला. रामपूर सहसवान संगीत घराण्याचे संस्थापक उस्ताद इनायत हुसेन ख़ान यांचे ते पणतू होते. आपले आजोबा (आईचे पिता) निसार हुसेन ख़ान हे राशिद ख़ान यांचे हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत गायकीतील गुरू होते. हमारे घराने में हर रंग की मौसिकी (संगीत गायकी) होती है। ठुमरी, दादरा, ख़याल, ग़ज़ल... असे ते म्हणत.
पायल मोरी बाजे (राग श्याम कल्याण)
मतवारी कोयलिया (राग बहार)
पिया नहीं घर (राग मारु बिहाग)
हे त्यांचे रागदारी संगीत काय; किंवा आओगे जब तुम सजना हे हिंदी फिल्मी गाणे काय. एवढेच नव्हे; तर ते ग़ज़ल गायकीतही कमी नव्हते!
...पण आता उस्ताद राशिद ख़ान हे लौकिक जग सोडून अलौकिक जगाच्या प्रवासाला निघून गेले आहेत. त्यांचा पैगंबरवास आपल्याला दु:खी करून गेला आहे, यात संशय नाही.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

# अटल सेतूचा वापर सहल अन् मौजमजेसाठी !

## ■ जीव धोक्यात घालून फोटोशूट
## ■ बेशिस्तांवर कारवाईची मागणी

◣ **मुंबई: प्रतिनिधी**



**मुंबईला दक्षिण मुंबईशी जलदरित्या जोडण्यासाठी अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतू बांधण्यात आला आहे. मात्र, या वेगवान मार्गावर जिवावर उदार होऊन काही सुजाण नागरिकांकडून फोटोशूट सुरू असल्याचे समाजमाध्यमांवरील फोटोंवरून दिसून आले आहे. विशेष म्हणजे, भाजप नेते किरीट सोमय्या यांनीही या सेतूवर सेल्फी काढल्याचे फोटो नेटकऱ्यांनी प्रसारित केले आहेत. तसेच त्यांना यासाठी ट्रोलही करण्यात आले आहे.**

मुंबईला समुद्रमार्गे जलदरित्या जोडण्यासाठी अशा सेतूसाठीचा विचार सत्तरीच्या दशकापासून सुरू होता. अनेक वर्षानंतर हा सेतू उभारणीला मुहूर्त येऊन तो विक्रमी वेळेत पूर्ण झाला आहे. मात्र सेतू सुरू होऊन दोन दिवस होत नाहीत तर नागरिकांकडूनच या सेतूवर नियमबाह्य कामे सुरू झाली आहेत. प्रत्यक्ष प्रवासापेक्षा सहल, मौजमस्ती म्हणून हा सेतू वापरला जात आहे.

यासंदर्भात अनेक नेटकऱ्यांनी एक्ससह समाज माध्यमांवर चिंता व्यक्त करीत छायाचित्रे टाकली आहेत. एका छायाचित्रात एक स्त्री व पुरुष रस्ता दुभाजकावरील शिडीवरून बिनधास्त मार्गाच्या दुसऱ्या बाजूला जाताना दिसत आहेत. तिथे आजुबाजूला अनेकजण रस्त्यावर उभे आहेत. तर अन्य एका छायाचित्रात रस्त्यात गाडी थांबवून छायाचित्र घेत आहेत. शेजारी, वापरलेले शहाळे तसेच टाकण्यात आले आहे. काही छायाचित्रांत रस्त्यावर उतरून छायाचित्र काढणे, गाडी रस्त्यावरच थांबवून बाजूच्या रेलिंगला रेटून उभे राहणे, सेल्फी काढण्याचे प्रकार होत आहेत.

छायाचित्रानुसार अशी कृत्ये करणारे सारे सुजाण नागरिक असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. त्यामुळे नेटीझन्सकडून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला आहे. अशांना धरून न भूतो न भविष्यती असा दंड ठोठवावा, २० हजार रुपये दंड व सहा महिने शिक्षा द्या, यांना सर्वसामान्य जाणीव का नाही, या प्रकारच्या प्रतिक्रिया देण्यात आल्या आहेत.

**सेतूवर थांबणे धोकादायक**

हा सेतू ताशी १०० किमी वेगाच्या वाहनांसाठी तयार करण्यात आला आहे. सेतूची तेवढी क्षमता असून, प्रत्यक्षात कामासाठी प्रवास करणारे त्या वेगाने जात आहेत. अशावेळी केवळ सहल, मौजमस्ती, मजा करण्यासाठी सेतूवर मधेच गाडी थांबविणे, हे भीषण अपघाताला निमंत्रण ठरते. त्यामुळेच सेतूवर थांबणे हे धोकादायक असून, नैतिकदृष्ट्या व नियमाच्या दृष्टीनेदेखील चूक आहे. एमएमआरडीएने विक्रमी वेळेत एक आंतरराष्ट्रीय दर्जाचा सेतू उभा करून दिला आहे. त्याचा सांभाळ करणे आता नागरिकांच्या हाती आहे. तसेच पोलिसांनीही या नियम तोडणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी अपेक्षा एमएमआरडीए संबंधितांनी व्यक्त केली आहे.

**सेतूवर रेंगाळणाऱ्यांवर कारवाई**

वांद्रे-वरळी सागरी सेतूप्रमाणेच नुकत्याच सुरू झालेल्या शिवडी-न्हावा शेवा अटल सेतूवर विनाकारण वाहन उभी करण्यास मनाई आहे. असे असतानाही गेल्या दोन दिवसांत अनेकजण वाहने कडेला लावून फोटो, व्हीडीओ, तसेच विनाकारण रेंगाळत असल्याचे निदर्शनास आले. यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो आणि त्याचबरोबर वेगात येणाऱ्या वाहनांचा अपघात होण्याचा धोका संभवतो. त्यामुळे या प्रकाराची गंभीर दखल घेत १२० वाहनचालकांवर कारवाई केली. अटल सेतूवरून प्रवास करताना वाहने धोकादायकरित्या थांबवू नयेत, असे आवाहन वाहतूक पोलिस सहआयुक्त प्रवीण पडवळ यांनी केले आहे.

# राज्यातील पतसंस्थांच्या ठेवींना मिळणार विम्याचे संरक्षण कवच

## ■ विजयराव औटी यांचा पाठपुरावा ■ सहकार आयुक्तांशी सकारात्मक चर्चा

◣ **पारनेर : प्रतिनिधी**

**सर्वसामान्य वर्गापासून मध्यमवर्गीय पर्यंतच्या ठेवीदारांच्या पतसंस्थांमधील ठेवींना आता विम्याचे संरक्षण कवच मिळणार आहे.**
पतसंस्थेच्या ठेवींना संरक्षण देण्याचा प्रस्ताव सहकार विभागाने राज्य सरकारकडे पाठविला असून मंजूरीसंदर्भात मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय होणार असल्याची माहिती सहकार आयुक्त अनिल कवडे यांनी दिली.
सहकार आयुक्त अनिल कवडे यांच्याशी पुण्यात विधानसभेचे माजी उपाध्यक्ष विजयराव औटी यांनी राज्यातील पतसंस्थेमधील ठेवींना विमा संरक्षण द्यावी अशी मागणी करत विविध विषयांवर दोन तास चर्चा केली त्यावेळी ते बोलत होते.
माजी आ.औटी म्हणाले,राज्यात सुमारे २० हजारांच्या आसपास विविध प्रकारच्या सहकारी पतसंस्था आहेत.ग्रामीण भागात अशा पतसंस्थांचे मोठे जाळे पसरलेले आहे. विविध स्तरातील लाखो ठेवीदार अशा पतसंस्थांमध्ये गुंतवणूक करतात आलेल्या ठेवींवर कर्जवाटप करण्यात येते मात्र एखाद्या पतसंस्थेच्या चौकशी मुळे इतर पतसंस्थांना अडचण होते ठेवीदार गोंधळून जात
इतर पतसंस्थेंमधील ठेवी काढत स्वत:चे नुकसान करून घेतात ठेवींवरच कर्जवाटप पतसंस्थेने केले असल्याने एकदम ठेवी वाटप करता येत नाही यामुळे संस्था अडचणीत येत आहे.या सर्व बाबींवर आयुक्त कवडे यांच्याशी चर्चा करत याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा



अशी मागणी केली आयुक्त कवडे यांनी याबाबत माहिती देत राज्य सरकारकडे हा प्रस्ताव सादर करण्यात आला आसुन राज्य मंत्रीमंडळात यांस मंजुरी मिळणार असल्याची माहिती दिली.

**कर्जदारांची पत तपासणार**

राज्यात सहकाराचे फार मोठे जाळे आहे पतसंस्थेमध्ये ठेवींची संख्या अधिक आहे.या ठेवींना विमा संरक्षण देणेबाबतचा प्रस्ताव सहकार कार्यालयामार्फत राज्य सरकारकडे पाठविण्यात आलेला आहे.याबरोबरच पतसंस्थेमध्ये कर्जवाटप
करताना पत तपासून पाहणार आहोत
**अनिल कवडे,** सहकार आयुक्त

**ठेवीदारांनी घाबरुन जावू नका**

पतसंस्थांनी कर्जवाटप करताना फक्त इतर पतसंस्थेच्या ना हरकत दाखल्यावर कर्ज वाटप करू नये.राष्ट्रीयकृत बँक,नागरी बँका यांचाही ना हरकत दाखला पाहुन काळजीपूर्वक कर्जपुरवठा करावा.ठेवीदारांनी घाबरून जाऊन ठेवी काढु नयेत ज्यांनी ठेवी काढल्या आहेत त्यांनी त्या परत ठेवाव्यात संस्था बंद पडली तर कर्जवसुली करता येणार नाही यामुळे ठेवी कदापी मिळणार नाही.
**विजयराव औटी,** माजी आमदार

(पान १ वरून)

## एक घास समाजासाठी; मराठा मोर्चातील पाच लाख आंदोलकांना जेवण

मनोज जरांगे पाटील यांच्यासह आंदोलकांचे स्वागत करण्यात येणार आहे.त्यासाठी तब्बल १६५ एकर जमीन स्वच्छ व सपाट करण्याचे काम सुपे येथील जेसीबी मालक चालकांनी स्वयंस्फूर्तीने पुढाकार घेत सुरू केले आहे.

**सुपे येथे मराठा योध्दा जरांगे यांची सभा**

मोर्च्याचे पारनेर तालुका हद्दीत आगमन झाल्यावर सुपे येथे मराठा योध्दा मनोज जरांगे पाटलांच्या सभेचे आयोजन करण्यात आले आहे.या सभेसाठी तालुक्यासह शेजारील श्रीगोंदे,जुन्नर तालुक्यातील किमान दोन लाख समाज बांधव उपस्थित राहतील असा अंदाज आहे.
त्यादृष्टीनेही नियोजन सुरू आहे.
तब्बल पाच लाख मराठा आंदोलकांना जेवण देण्यासाठी अनेक दानशूर व्यक्तींनी तयारी दर्शवली होती. त्याच बरोबर सर्वसामान्य समाज बांधवही धान्य, भाजीपाला पुरवण्यासाठी पुढे आले होते.मात्र मराठा मोर्चा नियोजनात तालुक्यातील प्रत्येक कुटुंबाचा समावेश असावा यासाठी एक घास समाजासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगण्यात आले.

# शंभुराजे फायटर्स संघ पहिल्या क्रमांकाचा मानकरी

■ संदीप पाटील क्रिकेट लिग खासदार चषक स्पर्धा ■ एक लाखांचे बक्षीस व चषक देऊन सन्मानित




■ संदीप पाटील क्रिकेट लिग खासदार चषक क्रिकेट स्पर्धेत प्रथम क्रमांक शंभुराजे फायटर्स या संघाने एक लाख रुपये व चषक मिळवला.( छाया - संदीप ईधाटे,निघोज )

**खासदार चषक क्रिकेट स्पर्धेच्या निमित्ताने या ठिकाणी मान्यवर मोठ्या संख्येने आले हजारो क्रिकेट प्रेमी या ठिकाणी येऊन सामन्याचा खरा आनंद घेतला मात्र या स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभासाठी खासदार डॉ सुजय विखे पाटील आले असते तर फार बरे झाले असते हे बोलत असताना संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील यांचा कंठ दाटून आला ते यावेळी त्यांना भावना अनावर झाल्या. विखे पाटील यांनी आम्हाला भरभरून दिले मात्र ते आज आले असते आणि त्यांची शाबासकी आमच्या सहकाऱ्यांना मिळाली असती तर फार बरे झाले असते हे आभाराचे भाषन वराळ पाटील यांना भावना अनावर झाल्याने अर्ध्यावर थांबवावं लागले.**

निघोज : प्रतिनिधी

**गेली चार दिवस निघोज येथील वेताळबाबा स्टेडियमवर सुरू असलेल्या संदीप पाटील क्रिकेट लिग खासदार चषक स्पर्धेत शेवटच्या दिवशी रोमहर्षक सामन्यात कोण जिंकणार याची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. अंतिम फायनल सामना शुंभुराजे फायटर्स संघ विरुद्ध सक्षम प्रतिष्ठान यांच्यात होउन यामध्ये शंभुराजे फायटर्स संघाने सामना जिंकत प्रथम क्रमांकाचे एक लाख रुपये तसेच चषक जिंकला आहे.**

या अंतीम सामन्यात सक्षम प्रतिष्ठान संघाने पाच षटकांमध्ये ६८ धावा करीत ६९ धावा करण्याचे आव्हान शंभुराजे फायटर्स संघाला दिले होते शेवटचे दोन बॉल राखीत शंभुराजे फायटर्स या संघाने हा अटीतटीच्या लढतीत विजय मिळवून संदीप पाटील क्रिकेट लिग खासदार चषक स्पर्धेत नाव कोरीत इतिहास घडविला, या शंभुराजे फायटर्सचे मालक माजी सरपंच सुभाष गाडीलकर, माजी ग्रामपंचायत सदस्य दत्ता गुंड,माजी चेअरमन युवराज कारखिले तसेच संघातील खेळाडूंचा सत्कार करुन सन्मानित करण्यात आले. द्वितीय क्रमांकाचे ७१ हजार रुपये तसेच चषक मुंबई येथील व्यवसायिक निलेशशेठ वराळ यांच्या सक्षम प्रतिष्ठान संघाला देण्यात आले. तृतीय क्रमांक पारितोषिक ५१ हजार रुपये व चषक महाराजा प्रतिष्ठान या संघाला देण्यात आले. चतुर्थ क्रमांक ३१ हजार रुपये बक्षीस व चषक मळगंगा किंग ईलेव्हन या संघाला देण्यात आले.

उत्कृष्ट गोलंदाज पुरस्कार गणेश गाडीलकर, धीरज गायकवाड,गोटू खामकर यांना देण्यात आला. विकेट हॅटट्रिक पुरस्कार प्रतिक आल्हाट यांना तसेच चौकार हॅटट्रिक पुरस्कार ओमकार उदावंत, कृष्णा सातपुते तुषार रणदिवे यांना देण्यात आला. मॅन ऑफ दी सिरीज असिफ शेख आणी ओमकार उदावंत यांना विभागून देण्यात आला. यावेळी त्यांना दुचाकी देण्यात आली. पत्रकार शिवाजी शिर्के, नगरचे नगरसेवक मनोज कोतकर, जिल्हा परिषदेचे माजी सभापती काशिनाथ दाते, भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील, राळेगण थेरपाळचे सरपंच पंकज कारखिले, वडनेरचे सरपंच राहुल सुकाळे, शिरापूरचे सरपंच भास्करराव शिरोळे, सुप्याचे उपसरपंच दत्ता नाना पवार, शिरापूरचे उपसरपंच संतोष शिनारे, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील यांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ संपन्न झाला.वेताळबाबा स्टेडियमचे सुशोभीकरण समितीचे प्रमुख पदाधिकारी मेजर विकास वराळ यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

पप्पूशेठ पवार, दिपक काटे,सागर बेग, पप्पूशेठ जासूद, राजू नाना वराळ, विकासशेठ बोंडवे,दिनेश बाबर सरपंच बाळासाहेब आवारी, संजय पावडे, सुभाष खोसे, बाळासाहेब खोसे,मनोज मुंगसे,संग्राम पावडे, माऊली वरखडे, गणपत नरसाळे, सुभाष गाडीलकर,समीरभाई शेख,कौसरभाई पटेल,गणेश बोंबले पाटील,माऊली मोरे,प्रविण काटकर,शशिभाऊ कारखिले,पांडुरंग कारखिले , बाबाजी वाघमारे, भास्कर कवाद, संतोष ईधाटे, संदीप ईधाटे, विजय रासकर, आनंद भुकन, अविनाश भांबरे आदी तसेच क्रिकेट प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.निवेदक लहूशेठ साबळे तसेच प्रविण गायकवाड यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# कोरठणच्या हरिनाम सप्ताहास बुधवारपासून प्रारंभ

■ विविध कीर्तनकारांची उपस्थिती ■ सप्ताहाचे यंदा ४१ वे वर्ष



पिंपळगांवरोठा : प्रतिनिधी

**राज्यातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या कोरठण येथील खंडोबाच्या यात्रोत्सवास बुधवार दि १७ जानेवारीपासून अखंड हरिनाम सप्ताहाने प्रारंभ होत असून असून १७ ते २४ जानेवारी दरम्यान विविध कीर्तनकारांना आमंत्रित करण्यात आले आहे.**

वैकुंठवासी तुकाराम महाराज शास्त्री यांच्या प्रेरणेने व ह.भ.प.डॉ. विकासानंद महाराज मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली या सप्ताहाचे नियोजन करणत आल्याचे देवस्थानच्या अध्यक्षा सौ. शालिनी घुले, उपाध्यक्ष महेश शिरोळे, विश्वस्त राजेंद्र चौधरी यांनी सांगितले.

सप्ताहामध्ये बुधवार दि.१७ जानेवारी रोजी बीड येथील ह.भ. प.संतोष महाराज वनव यांची कीर्तन सेवा पार पडणार आहे.गुरूवार दि.१८ जानेवारी रोजी किल्ले धारूर येथील ह.भ.प. विकास महाराज देवडे, शुक्रवार दि. १९ रोजी भिगवण येथील ह.भ.प. विकास महाराज देवडे, शनिवार दि २० रोजी गेवराई येथील ह.भ.प. अक्रूर महाराज साखरे, रविवार दि.२१ रोजी आष्टी येथील ह.भ.प.सुनील महाराज झांबरे, सोमवार दि.२२ रोजी पैठण येथील ह.भ.प.शिवानंद महाराज शास्त्री, मंगळवार दि. २३ रोजी हिंगोली येथील ह.भ.प.सोपान महाराज सानप तर बुधवार दि. २४ जानेवारी रोजी सकाळी साडेदहा वाजता परभणी येथील ह.भ.प.बाळू महाराज गिरगांवकर यांच्या काल्याच्या किर्तनाने या सप्ताहाची सांगता होणार आहे.

या सप्ताहातील विविध धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन पांडूरंग गायकवाड, सचिव जालिंदर खोसे, खजिनदार तुकाराम जगताप, चिटणीस कमलेश घुले, अशोक घुले, विश्वस्त राजेंद्र चौधरी, चंद्रभान ठुबे, सुवर्णा धाडगे, सुरेश फापाळे, रामदास मुळे, महादेव पुंडे, धोंडीभाऊ जगताप, दिलीप घुले यांनी केले आहे.

### परंपरेनुसार सप्ताहाचे आयोजन

**यापूर्वी वार्षिक यात्रोत्सवाच्या काळातच अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्याची परंपरा होती. मध्यंतरीच्या काळात चंपाषष्ठी उत्सवादरम्यान सप्ताहाचे आयोजन करण्यात येत होते. मात्र गावातील वारकरी सांप्रदायातील ह.भ.प.नाथ भांबरे, चेअरमन पोपट सुपेकर, बबन भांबरे, महादू घुले, मार्तंड जगताप यांच्यासह वारकरी सांप्रदायाच्या मागणीनुसार यंदापासून पुन्हा यात्रोत्सवाबरोबच अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला आहे.**

**अशोक घुले**
मा. सरपंच, पिंपळगांवरोठा

### दैनंदिन कार्यक्रम

**या सप्ताहादरम्यान पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, सायंकाळी ७ ते ९ हरिकिर्तन व त्यानंतर महाप्रसाद व जागर असे दैनंदिन कार्यक्रमांचे स्वरूप आहे. सप्ताहाचे यंदाचे ४१ वे वर्ष आहे.**

# भालेकर यांच्या हिमोफिलिया पुस्तकाचे गोव्यात प्रकाशन

■ आंतरराष्ट्रीय पर्पल फेस्टीवल गोव्यात संपन्न ■ भालेकर यांचे पुस्तक प्रेरणादायी मा. मुख्यमंत्री दिगंबर कामत




पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर तालुका पत्रकार संघाचे सदस्य दादा भालेकर यांच्या हिमोफिलिया या पुरस्तकाचे गोव्याचे मा. मुख्यमंत्री दिगंबर कामत यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. वेदनादायी रक्तविकारांनी ग्रस्त असलेल्या हिमोफिलियाच्या रूग्णांचा संघर्ष बहुतांशवेळा अदृश्यच राहतो. हा संघर्ष प्रकाश झोतात आणण्याचे काम या पुस्तकाच्या माध्यमातून होईल असा विश्वास मा. मुख्यमंत्री कामत यांनी यावेळी व्यक्त केला.**

गोव्यातील पणजी येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय पर्पल फेस्टीवलमध्ये हिमोफिलिया सोसायटीच्या अहमदनगर चॅपटरचे अध्यक्ष दादा भालेकर यांच्या हिमोफिलिया या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी गोव्याचे समाजकल्याणमंत्री सुभाष फळदेसाई, दिव्यांग आयुक्त गुरूप्रसाद पावसकर, हिमोफिलिया फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष प्रेमरूप अल्वा, उपाध्यक्ष रामू गडकर, उपाध्यक्ष संतोष शर्मा, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश कामत, बाळशिराम गाढवे, सौरभ नल्लमवार, राधेश वर्टी आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना समाजकल्याणमंत्री सुभाष फळदेसाई म्हणाले, आंतरराष्ट्रीय पर्पल फेस्टीवलमध्ये १३ देशांनी सहभाग घेतला असून लोकशाहीच्या संवर्धनासाठी हिमोफिलियासह समाजातील सर्व घटकांचा विकास होणे गरजेचे आहे. गोवा राज्याने दिव्यांगांना अनेक सुख सुविधा उपलब्ध करून देत हिमोफिलिया रूग्णांसाठी भरीव असे काम करण्यात येत आहे. भालेकर यांच्या पुस्तकामुळे समाजात जागृती करण्यास मदत होईल, रूग्णांना दिलासा मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेही गुरूप्रसाद पावसकर, प्रेमरूप अल्वा, प्रकाश कामत यांनी हिमोफिलिया रूग्णांसाठी गोवा सरकारचे योगदान मोठै असल्याचे सांगितले.

### भालेकरांचे पुस्तक जनजागृतीसाठी उपयुक्त

**महाराष्ट्र राज्यातील हजारो हिमोफिलिया रूग्णांसाठी दादा भालेकर यांच्या हिमोफिलिया या पुस्तकामुळे दिलासा मिळणार असून या पुस्तकामुळे हिमोफिलिया या आजाराबाबत मोठी जनजागृती होण्यास मदत होणार आहे.**

**आ. नीलेश लंके**

# पळवे घाणेगाव रस्त्याची दुरावस्था

ग्रामस्थांना सहन करावा लागतोय मनस्ताप

पळवे खुर्द: प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील पळवे खुर्द ते घाणेगाव नागरिकांच्या सोयीचा असणारा दोन ते अडीच किलोमीटर रस्ता पूर्णपणे खराब झाला आहे. नुकत्याच झालेल्या पावसामुळे रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत त्यामुळे नागरिकांना गाडी चालवताना मोठी कसरत करावी लागत आहे. रस्ता मंजूर होऊन देखील या रस्त्याचे काम अद्याप झालेले नाही. यामुळे नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.**



या रस्त्यालगत व्यंकटेश प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी असून या कंपनीच्या अवजड वाहनांमुळे या रस्त्याची पूर्णपणे वाट लागली आहे. आणि प्रशासनाचेही या रस्त्याकडे दुर्लक्ष झालेले दिसत आहे.या रस्त्यालगत अनेक नागरिकांच्या वस्त्या आहेत. तसेच या रस्त्यालगत बऱ्याच शेतकऱ्यांची शेती असल्यामुळे जनावरांचा चारा, दूध उत्पादन शेतकरी, कंपनी कामगार, व्यावसायिक, शालेय विद्यार्थी यासह इतर वाहतुकीसाठी मोठी कसरत करावी लागत आहे.

पाऊस झाल्यानंतर त्या खड्डयांमध्ये पूर्णपणे पाणी साचते खड्ड्यांचा अंदाज न आल्याने याठिकाणी अनेक अपघात देखील झाले आहेत. मंजूर रस्त्याचे काम तातडीने सुरू करावे अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा पळवे खुर्द, घाणेगाव, गटेवाडीच्या ग्रामस्थांनी दिला आहे.

# राष्ट्रीय युवा दिनानिमित्त पारनेरमध्ये विविध उपक्रम

पारनेर महाविद्यालयाचा पुढाकार

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यामाने राष्ट्रीय युवा दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**




■ पारनेर महाविद्यालयात राष्ट्रीय युवा दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्रीय युवा दिनानिमित्त रॅलीचे आयोजन करण्यात येऊन प्रबोधन करण्यात आले. विकसित युवा भारत या विषयावर एचआयव्ही एडस विषयी विद्यार्थ्यांमध्ये जानजागृती व्हावी या उद्देशाने वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा तसेच पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी उत्सफूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल आठरे यांनी सांगितले की, राजमाता जिजाउंसारखी माता असेल तर छत्रपती शिवाजी महाराज घडतात. स्वामी विवेकानंद यांच्यासारखे पुत्र आपली किर्ती जगामध्ये पररवितात. अशाच आदर्श व्यक्तिमत्वांमुळे आज आपला भारत देश घडला असून त्यांचीच तत्वे आज आपल्याला विकसित करणार आहेत, ख-या अर्थाने जगविणार व वाढविणार असल्याचा विश्वास डॉ. आठरे यांनी व्यक्त केला.

यावेळी महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. तुकाराम थोपटे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. रविंद्र देशमुख, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. महेश आहेर, डॉ. हनुमंत गायकवाड, डॉ. माया लहारे, कार्यालयीन अधीक्षक सावकार काकडे, महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थी यावेळी मोठया संख्येने उपस्थित होते.

# संदीप दरेकर सावित्रीज्योती पुरस्काराने सन्मानीत

माता पित्यांनी स्विकारला पुरस्कार

नगर : प्रतिनिधी



**जय युवा अ‍ॅकॅडमी, महिला आर्थिक विकास महामंडळ व अहमदनगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा यंदाचा सावित्री ज्योती गौरव पुरस्कार संदीप दरेकर यांना देण्यात आला. पुण्यातील बजाज कंपनीमध्ये ट्रेझरी मॅनेजर पदावर कार्यरत असलेल्या संदीप यांचे वडील विश्वनाथ दरेकर व आई लक्ष्मी दरेकर यांनी हा पुरस्कार नगर येथे स्विकारला.**

गेल्या अनेक वर्षांपासून नगर येथे आयोजित करण्यात येणाऱ्या सावित्री ज्योती महोत्सवात राज्यातील शैक्षणिक, सामाजिक, वैद्यकिय, कृषि क्षेत्रांत मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तीमत्वांना या पुरस्काराने सन्मानीत करण्यात येते. यंदाही विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्या मान्यवरांना या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

पुणे येथील बजाज फिनसर्व्ह कंपनीच्या कार्पो रेट फायनान्स ट्रेझरी मॅनेजर पदावर काम करताना संदीप दरेकर यांनी उल्लेखनिय कामगिरी केल्याची दखल घेऊन त्यांना या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. संदीप यांच्या आई वडिलांकडे आ. संग्राम जगताप, महिला विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक संजय गर्जे, अ‍ॅड. सुरेश लगड, अ‍ॅड. महेश शिंदे, अ‍ॅड. अनिता दिघे, पोपटराव बनकर यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार सुपूर्द करण्यात आला.

अलिकडेच आम्ही नगरकर मुंबई संघाच्या दुसऱ्या वर्धापनदिनानिमित्त ठाणे येथे पार पडलेल्या विशेष कार्यक्रमात दरेकर यांना नगरकर विशेष पुरस्काराने सन्मातीन करण्यात आले होते. अकोल्याचे आमदार डॉ. किरण लहामटे, जिल्हा बँक तसेच जी.एस.महानगर बँकेच्या संचालिका गितांजली शेळके यांच्या हस्ते दरेकर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. दोन्ही पुरस्कार ह.भ.प.नारायण महाराज जाधव आणि आई वडिलांना समर्पित करीत असल्याचे दरेकर यांनी सांगितले.

# जिजाऊ, विवेकानंदांचे विचार आचारणात आणा

■ नीलेश जासूद यांचे आवाहन ■ गोरेश्वर विद्यालयात राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती



गोरेगांव : प्रतिनिधी

**राजमाता जिजाऊ तसेच स्वामी विवेकानंद यांचे विचार तरूणांना दिशा देणारे असून त्यांचे विचार व कार्य सर्व विद्यार्थ्यांना आचरणात आणण्याचे आवाहन शिक्षक नीलेश जासूद यांनी केले.**

गोरेगांव येथील गोरेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सामाजिक शास्त्र विभाग प्रमुख नीलेश जासूद यांनी अध्यक्षस्थान भुषवित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पुजन प्राचार्य सुरेश जावळे, नीलेश जासूद व विद्यालयातील शिक्षकांच्या हस्ते करण्यात आले.

जासूद म्हणाले, राजमाता जिजाऊ यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून स्वराज्य निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज घडविले. जिजाऊंनी शिवरायांवर रामायण आणि महाभारताचे संस्कार रूजविले. तलवारबाजी व युध्द कौशल्याचे धडेही दिले होते. स्वामी विवेकानंद लहानपणीपासूनच खूप हुषार होते. आपले संपूर्ण आयुष्य त्यांनी सामाजिक कार्यासाठी सपर्पित केल्याचे जासूद म्हणाले. कमल औटी यांनी प्रास्ताविक केले. शिक्षक मंगेश काळे, ज्योती वाघ, सुरेखा सुंबे, प्रा. राजेंद्र लोंढे यांनी आपल्या भाषणातून राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचा संक्षिप्त जीवनपट विद्यार्थ्यांपुढे मांडला. यावेळी सुरेश वैरागर, किरण उमाप, दत्तात्रेय नरसाळे, संजय मारवाडे, अनुपमा सोबले, सुजाता नरसाळे, मंजुषा शिंदे, संध्या नरसाळे, धनश्री वाघ, प्रिया डव्हणे, नंदकुमार गावडे, आनंदा काकडे, सतिश चव्हाण, सुखदेव थोरात, अनिता तांबे आदी उपस्थित होते. बाळासाहेब खिलारी यांनी सुत्रसंचलन तर कैलास खिलारी यांनी आभार मानले.

### विद्यार्थ्यांची प्रभावी भाषणे

**या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावरील भाषणे सादर केली. पियुष थोरात, श्रध्दा जाधव, प्रिया थोरात, अनन्या नरसाळे या विद्यार्थ्यांची भाषणे अतिशय प्रभावी झाली. उपस्थितांनी त्यांच्या भाषणांस उत्सफूर्त दाद दिली.**

# पारनेर महाविद्यालयास करिअर कट्टातर्फे सेंटर ऑफ एक्सलन्स मंजूर

बारामतीत धनादेशाचे वितरण



पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर येथील न्यू आर्टस् कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालयास करिअर कट्टा तर्फे सेंटर ऑफ एक्सलन्स मंजूर झाले असून त्याअंतर्गत स्पर्धा परीक्षा व कौशल्य विकास केंद्राच्या विकासासाठी एक लाख रुपयांचा निधी महाराष्ट्र शासनाकडून मंजूर झाला असून या निधीचे वितरण करिअर कट्टा तर्फे शारदानगर बारामती येथे करण्यात आले.**

त्याप्रसंगी सदर धनादेश स्वीकारताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर व करिअर कट्टाचे महाविद्यालयीन समन्वयक सहायक प्राध्यापक नितीन निपुंगे उपस्थित होते.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य आणि महाराष्ट्र माहिती व तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन तरुणांसाठी आय.ए.एस आपल्या भेटीला व उद्योजक आपल्या भेटीला असे दोन महत्त्वपूर्ण उपक्रम राबवले जात आहेत. त्या उपक्रमांतर्गत स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकास व्हावा यासाठी मार्गदर्शन केले जाते. यामुळे सदर सेंटर ऑफ एक्सलन्स अंतर्गत स्पर्धा परीक्षाची तयारी करणारे विद्यार्थी व उद्योजकतेची तयारी करणारे विद्यार्थी यांना या सेंटरचा लाभ होणार आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com